■ वर्ष- ११ ■ अंक- ३३ ■ मुंबई, मंगळवार, १ जुलै ते ७ जुलै २०२५ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार

3 → भिकेची भलामण!

ठाणे शहरात १०४ खेळांची मैदाने, मात्र खेळायला जागाच नाही ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# मंडेला कला विद्यार्थ्यांसाठी एक बुद्धिवर्धक - प्रोफेसर प्रकाश पांगम आश्रय ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव

## मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक











गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर व आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकादमी व राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान शुक्रवार दिनांक 27 जून 2025 रोजी आयोजित केले होते. सिन्नर महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य करिअर कट्टा या विभागाने पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमी मंजूर केली आहे. या पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना नियमितपणे मैदानी सराव लेखी चाचण्या लेक्चर्स व मार्गदर्शन व्याख्याने घेतली जातात. विद्यार्थ्यांचे मन चित्त एकाग्र होण्यासाठी एक बुद्धीवर्धक म्हणून मंडेला कला कशी उपयुक्त ठरते याची उदाहरणे देऊन प्रोफेसर प्रकाश पांगम सर यांनी विद्यार्थ्यांसाठी मंडेला कला कार्यशाळा घेतली यामध्ये विद्यार्थ्यांना कंपासच्या साह्याने वतुर्ळे काढून त्यामध्ये पेन्सिल अथवा बॉलपेनच्या सहाय्याने विविध प्रकारच्या डिझाइन्स नक्षी काढून छान कलेची अनुभूती करून दिली. या कलेमध्ये विद्यार्थ्यांचे ध्यान एकाग्र होऊन त्याचा फायदा त्यांना अभ्यासात मैदानी खेळात तसेच भविष्यात व्यवसायिक दृष्टिकोनातूनही कसा करता येऊ शकतो याविषयी मार्गदर्शन केले. वाढत्या वयामध्ये विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार गरजेचा आहे त्यातूनच त्यांची शारीरिक व मानसिक आरोग्याची आरोग्याचा विकास होणार आहे ,असे प्रतिपादन डॉक्टर सोनल काठोळे यांनी केले. अभ्यासाबरोबरच ज्ञानाच्या विकासासोबत मानसिक आरोग्याचा ही विकास साधण्यासाठी मंडेला कला उपयोगी ठरणार आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.यु.पाटील यांनी केले. या कलेमध्ये आपला लहान मेंदू सतर्क राहून ध्यान धारणेला एकाग्र चित्ताला उपयोगी व्यायाम कृती ठरते. असे मत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.यु. पाटील, उपप्राचार्य आर व्ही पवार , प्राध्यापिका दिपाली सूर्यवंशी हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन करिअर कट्टा पोलीस प्रशिक्षण अकादमी व एनसीसी प्रमुख लेफ्टनंट संदीप बाळासाहेब भिसे यांनी केले. यामध्ये महाविद्यालयीन युवक व युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# महाराष्ट्रात ५१ IPS अधिकाऱ्यांच्या बदल्या, कोणत्या पोलिस अधिकाऱ्यांना मिळाली महत्वाची जबाबदारी



**मुंबई :** महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाने ५१ भारतीय सेवा अधिकारी आणि ८१ राज्य पोलिस सेवा अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. पोलिस यंत्रणा प्रभावी बनवण्यासाठी राज्य सरकारच्या गृह विभागाने निर्णय घेतला असून काही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. यात मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. सरकारच्या आदेशानुसार तीन नवीन पोलिस आयुक्तांच्या बदल्या पुणे शहरात करण्यात आल्या. पुण्यातील परिमंडळ दोन विभागाच्या पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची पोलिस प्रशिक्षण विभागात बदली करण्यात आली. वाहतूक विभागाचे उपायुक्त अमोल झेंडे यांचीही बदली करण्यात आली.

**कोणत्या पोलिस अधिकाऱ्यांना मिळाली महत्वाची जबाबदारी ?**

पुण्यातील शस्त्र तपासणी शाखेच्या पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची राज्य राखीव पोलिस दल (SRPF) गट १, पुणे येथे कमांडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, ठाणे शहरातील पोलिस उपायुक्त (DCP) महेंद्र पंडित यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे. याशिवाय, पुण्यातील डीसीपी स्मार्तना पाटील यांची खंडाळा येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात बदली करण्यात आली आहे. डीसीपी वाहतूक (Traffic Police) अमोल झेंडे यांना दौंड येथील एसआरपीएफमध्ये कमांडरची जबाबदारी देण्यात आली आहे.कोल्हापूरचे पोलिस अधीक्षक तुषार पाटील यांची मुंबईत डीसीपी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याशिवाय विजय पवार, सुनील लोखंडे, नम्रता पाटील आणि स्मिता पाटील यांनाही मुंबईतील पोलिस उपायुक्तपदाची नवीन जबाबदारी देण्यात आली आहे. अशाप्रकारे, एकूण पाच आयपीएस अधिकाऱ्यांना मुंबईत डीसीपी म्हणून बढती देऊन त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गृहविभागाच्या वतीने करण्यात आलेल्या बदल्या मोठ्या शहरांमध्ये पोलिस प्रशासन मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे, एवढंच नाही तर महत्त्वाच्या पदांवर अनुभवी अधिकाऱ्यांची नियुक्ती करून गुन्हेगारी नियंत्रण, कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. येत्या काळात ही प्रक्रिया वेगवान केली जाऊ शकते जेणेकरून राज्यभरात पोलिस यंत्रणा अधिक कार्यक्षम करता येईल. त्यामुळे गुन्हेगारांना आळा घालण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचं मार्गदर्शन महत्वाचं ठरणार आहे.

# खोणी पलावा सोसायटीमधून २ कोटींचे अमली पदार्थ जप्त

## हाय प्रोफाईल सोसायटीत ड्रग्सचे रॅकेट मानपाडा पोलिसांची कारवाई




**कल्याण ।** कल्याण परिमंडळ तीनमध्ये पोलिसांनी अमली पदार्थ विरोधात मोठी कारवाई करत मोठ्या प्रमाणावर एमडी ड्रग्स जप्त केले आहे. डोंबिवलीच्या खोणी पलावा येथील डाउनटाऊन मधील एका हायप्रोफाईल सोसायटीमध्ये छापा टाकून पोलिसांनी दोन कोटी बारा लाख रुपयांचा एक किलो ९३ ग्राम एमडी ड्रग्स जप्त केले आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांना अटक केली. यामध्ये दोन पुरुष तर एका महिलेचा समावेश असून त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली यांना माहिती मिळाली की गुरुवारी रात्री डाऊन टाउन, खोणी पलावा याठिकाणी काही चुकीचे कृत्य होत आहे. या ठिकाणी छापा टाकून आरोपींकडून १.९३ किलो मेफेड्रॉन (एमडी) किंमत २.१२ कोटी रकमेपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करून संबंधितांना अटक केली. त्यांच्यासोबत राहणार्या परंतु पसार झालेल्या दोन साथीदारांना रात्रीच अटक करण्यात आली. तसेच इतर आरोपींचा शोध सुरू आहे. ही कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राम चोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक कलगोंडा पाटील, संपत फडोळ, पोलीस शिपाई बडे, दिघे यांच्या पथकाने केली आहे.

# अंधश्रद्धेतून महिलेचा खून, आरोपीस अटक

**कळवा :** कळवा स्टेशन जवळील सीमा हाईट्स या इमारती मध्ये मजुरीचे काम करणाऱ्या महिलेची हत्या करून, तिचे दागिने चोरून नेणाऱ्या तीन आरोपींना कळवा पोलीस आणि गुन्हे शाखा यांनी बिहार राज्यातून अटक केली आहे. याबाबत माहिती देताना सहाय्यक पोलीस आयुक्त उत्तम कोळेकर यांनी सांगितले की, पंधरा दिवसांपूर्वी तीन आरोपी हे कळवा झोपडपट्टी येथे राहिले, हत्या करण्याच्या उद्धेशानेच ते बिहार येथून आले होते. भारतात अजून अंधश्रद्धा खूप आहे. बिहार सारखे राज्य सुद्धा अजून मागास आहे, बिहारमधील खगडिया या जिल्ह्यातील गावात अशी अंधश्रद्धा आहे की जर दागिने चोरी करायला सुरुवात करायची असेल तर त्या अगोदर एका महिलेची हत्या करायची, तो एक शुभशकून मानला जातो, आणि यासाठी ते तीनही आरोपी बिहार मधून इथे आले. १४ जूनला त्यांनी शांताबाई चव्हाण या बिगारी काम करणाऱ्या महिलेला सीमा हाईट्स या बिल्डिंग येथे कामानिमित्त नेले आणि तिची चाकूने वार करून हत्या केली. जाताना त्यांनी तिच्या गळ्यातील आणि कानातील दागिने काढून घेऊन ते विकले होते. कळवा पोलिसांनी आणि गुन्हे शाखेने एकत्रित तपास करत कोणताही पुरवा नसताना तांत्रिक विश्लेषणाद्वारे, सिसिटीव्ही तपासात हे आरोपी बिहारला पळून गेल्याचे शोधून काढले. पोलिसांची तीन पथके बिहार राज्यातील खगडिया येथे पोहचली आणि तिन वेगवेगळ्या ठिकाणाहून या तिनही आरोपिंना त्यांनी ताब्यात घेतले, त्यातील एकाच्या घरातून एक गावठी कट्टा आणि तीन जिवंत काडतूसे त्यांनी हस्तगत केली. या तिघांना कळवा पोलीस स्टेशन येथे आणल्यावर त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले आणि हत्या झालेल्या महिलेचे दागिने विकून त्यांच्या अकाऊंटला जमा झालेले बावीस हजार रुपये जप्त केले, न्यायालयाने यातील दोन आरोपींना १ जुलैपर्यंत पोलीस कस्टडी सुनावली आहे.



# ‘या’ चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!

घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.

**हेअरकट** : हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.



**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

**टॉवेलची स्वच्छता**

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

**आता आली फेकून देण्याची वेळ**

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

**टर्किश की कॉटन टॉवेल**

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

**सूर्यप्रकाश महत्त्वाचा**

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.



**एकट्याने वापरण्याची गरज**


शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.

# सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खा आणि रोग टाळा

## स्प्राउटेड चणे वापरण्याचे ८ फायदे

**सकाळी :** सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खाणे खूप फायदेशीर आहे, यामुळे शरीर स्वस्थ राहते आणि रोग जवळपास देखील येत नाही. स्प्राउटेड चणे संपूर्ण किंवा वाटून साखर आणि पाण्यासोबत खाल्ल्याने शरीरातील प्रोटीनचे प्रमाण कायम राहते. तसेच स्नायू देखील मजबूत होतात. कोणत्याही स्वरूपात स्प्राउटेड चणे वापरणे फायदेशीर आहे. हे सलाड म्हणून देखील वापरले जातात. यामध्ये प्रोटीन, विटामिन आणि फायबरचे असलेले प्रमाण तणाव दूर करण्यास मदत करते.

- चण्यामध्ये फायबरची मात्रा जास्त राहते. भिजवून खाल्ल्याने पोट किंवा कब्जा संबंधी समस्या टाळता येते.
- मूत्र समस्या असल्यास किंवा पुन्हा पुन्हा मूत्र येत असेल तर चणा अत्यंत फायदेशीर आहे.
- रिकाम्या पोटी चणे खाण्याने शरीरात अतिरिक्त प्रमाणात ग्लुकोज बनत नाही. मधुमेह देखील नियंत्रणात राहतो.
- मानसिक तणाव असलेल्या लोकांसाठी चणा खूप फायदेशीर आहे.
- सकाळी वाटलेल्या चण्यासोबत साखर किंवा पाणी मिसळून प्यायल्याने मानसिक तणाव दूर होतो.
- कावीळ असलेल्या रुग्णांनी नियमितपणे चणे खावे. हे बरेच फायदेशीर असतात.
- स्प्राउटेड चणे हिरव्या मुगासोबत खाल्ल्याने खाण्याने प्रोटिनची मात्रा वाढते.
- याच्या नियमित सेवनाने थकवा दूर होण्यास मदत मिळते.



# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.



खिऱ्याचे सूप

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# घसादुखीवर ‘हे’ झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्‌भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..


१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल. याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्‌भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.




**मिरा भाईंदर महानगरपालिका**

कार्यालय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे -४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२ - २२२८१९९०९३ Ext. ११८
ई-मेल : publichealth@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

जा.क्र. मनपा/सार्व.आ.वि/६४३/२०२५-२६ दिनांक : २६/०६/२०२५

**// E-TENDER NOTICE//**

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION INVITES TENDERS FOR LAUNDRY CONTRACT FOR WASHING UNIFORMS OF STAFF. BED SHEETS AND ALL OTHER LINEN OF BHARATRATNA INDIRA GANDHI HOSPITAL.

TENDER FORM WILL BE AVAILABLE FROM DT. 30/06/2025 UPTO DT. 17/07/2025 BEFORE 01:00 NOON ON WEBSITE https://mahatenders.gov.in.

THE DATE OF ONLINE SUBMISSION OF TENDER DOCUMENTS IS UPTO DT. 18/07/2025. BEFORE 12:00 NOON AND OPEN ON DT. 22/07/2025 AT 04:00 PM.

MUNICIPAL COMMISSINOR RESERVED ALL THE RIGHT TO ACCEPT OR REJECT TENDER.

**DETAIL OF WORK-**

| SR NO. | NAME OF WORK | APPROX COST | E.M.D | TENDER FORM FEE |
|---|---|---|---|---|
| 1. | LAUNDRY CONTRACT FOR WASHING UNIFORMS OF STAFF. BEDSHEETS AND OTHER ALL LINEN IN BHARATRATNA INDIRA GANDHI HOSPITAL. | RS. 30,00,000/- | RS. 95,000/- | RS. 5700/- + RS. 1026 (GST 18%) = RS. 6,726/- |


Ref. No. : MBMC/PRO/Ad./E-5856353/2025-26

Date : 26/06/2025


**(KAVITA BORKAR)**
**DEPUTY COMMISSIONER**
**PUBLIC HEALTH DEPARTMENT**
**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

## संपादकीय

# भिकेची भलामण !



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




नवे शैक्षणिक धोरण आणि तिसऱ्या भाषेच्या पुरस्काराचे कारण पु ढे करून महाराष्ट्राच्या शैक्षणिक व्यवस्थेत हिंदी भाषेस घुसवण्याचा ज ो प्रयत्न सुरू आहे, त्याचे वर्णन भिकेचे डोहाळे यापेक्षा वेगळे करता येणे अशक्य. हिंदी ही ज्ञानभाषा नाही. मुळात हिंदी ही एकच एक अशी भाषा नाही. मैथिली, ब्रज, भोजपुरी इत्यादी डझनभर उत्तर भारतीय प्रादेशिक भाषांच्या संकरातून एकमेकांस कळेल अशा शब्दांची जी बोली तयार झाली ती हिंदी, अशी हिंदी भाषेच्या निर्मितीसंदर्भात एक मांडणी केली जाते.

हिंदी न आल्याने एखाद्याचे काहीही बिघडत नाही आणि कामचलाऊ हिंदी शिकण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागते असेही नाही. तरीही तिचा पुरस्कार करतात ते 'एक देश, एक भाषा, एक धर्म, एक देव' (आणि शक्य झाल्यास एक राजकीय पक्ष आणि एक नेता) अशा विचारांचे पाईक असतात. त्यांना हिंदीशी भाषा म्हणून काही अभिजात सांस्कृतिक देणेघेणे आहे, असे अजिबात नाही. रामधारी सिंह दिनकर, प्रेमचंद, सुमित्रानंदन पंत, हरिवंशराय बच्चन, कमलेश्वर, फणिंद्रनाथ वेणु, नीरज, दुष्यंतकुमार आदी नामवंत साहित्यिकांची हिंदी या मंडळींना परिचित आहे असेही नाही. मागच्या दाराने हिंदी घुसवणाऱ्यांस अभिप्रेत आहे ती हिंदीच्या विविध बोलींच्या लहेजांशी दूरान्वयानेही संबंध नसणारी, खोट्या नम्रतेचे प्रदर्शन करणारी, उगीचच साखरेच्या पाकात घोळल्यासारखी चिकट भाषा. तीस महाराष्ट्रातून विरोध होत असेल तर ते योग्यच. हा भाषा-कारणाचा विरोध समजून घ्यायला हवा आणि त्यामागील राजकारण लक्षात घ्यायला हवे.

कारण नागरी भावना, भाषा, संस्कृती यांबरोबरच तारतम्य आणि तर्क याच्याशी या राज्यातील सत्ताधाऱ्यांची नाळ पुरती तुटलेली असताना हे वास्तव समाजानेच समजून घेणे अंतिम हिताचे आहे. राज्यातील अनेक गंभीर प्रश्न थंडावण्यासाठी ठेवून अचानक स्वभाषेतूनही नीट संवाद साधता न येणाऱ्या वयातील मुलांना शाळांतून तिसरी भाषा शिकवण्याचा घाट या राज्यातील शासकांनी घातला. अगदी काहीच दिवसांपूर्वी विविध अपघातांत बळी गेलेल्या निष्पापांचा विषय अलगद बाजूला सारून सत्ताधाऱ्यांच्या सर्व यंत्रणा या तिसरी भाषा किंबहुना हिंदी येणे, शिकणे, शिकवणे कसे अत्यावश्यक आहे यावरच खल सुरू राहावा आणि येऊ घातलेले अधिवेशनही जमल्यास त्यातच सरावे अशा प्रयत्नात असल्याचे दिसते.

गमतीचा मुद्दा म्हणजे हिंदी किंवा तिसरी भाषा अगदी लहान मुलांना का शिकवावी याचे ठोस तार्किक उत्तरही त्यांच्याकडे असल्याचे दिसत नाही. त्यामुळे हा राजकीय मुद्दाच कसा आहे, हा हिंदी द्वेष कसा आहे इतक्याच मुद्द्यांभोवती यांचे युक्तिवाद फिरतात. मराठीचा आग्रह राखतानाच राज्यातील हिंदी, गुजराती फलक, सूचना या मराठी जन मोठ्या मनाने स्वीकारतात. असे असताना फक्त भाषिक द्वेषातून निर्णयाला विरोध होतो असे म्हणणे हा अगोचरपणा ठरेल. नाही म्हणायला लहानपणी मुले पटकन शिकू शकतात असा एक दुबळा युक्तिवाद तोंडी लावण्यास असतो. तो भाषातज्ज्ञ, साहित्यिक, अध्यापक, शिक्षक अशा शिक्षणाशी आणि भाषेशीही संबंधितांनी पुरता खोडून काढल्यानंतरही हट्ट मागे घेण्याची जाग शासकीय बालबुद्धीस आलेली नाही. मुळात शिक्षण या विषयात शासनाने आणि प्रशासनाने त्यांच्या मयार्दा ओळखणे गरजेचे आहे. कुणाच्या मना आले म्हणून किंवा मिळालेले पद गाजवण्यासाठी काही तरी चमत्कृती करण्याचा अधिकाराचा सोस किंवा समाजाचे लक्ष वळवण्यासाठीचे एखादे खेळणे अशा किंवा तत्सम कोणत्याही कारणाने शिक्षणासारख्या विषयांत ढवळाढवळ करणे हे हिताचे नाही, याचे तारतम्य यंत्रणांनी बाळगणे अत्यावश्यक आहे. समाजाचा यंत्रणांवरील ढळत चाललेला विश्वास अशा आततायी, अतार्किक निर्णयातून अधिकच मातीत मिसळेल इतपत स्वहिताची जाणीव तरी राखावी.

राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत त्रिभाषा सूत्र आहेच. ते या राज्याला नवे नाही. आता मुद्दा ते पहिलीपासून म्हणजेच साडेपाच किंवा सहा वर्षांच्या मुलांसाठी लागू करण्याचा आहे. ते इष्ट नाही हे भाषा आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांचे मत आहे. एखादा शासन निर्णय जाहीर करताना त्याचे परिणाम, कारणे, तो आताच का अशा किमान प्रश्नांची उत्तरे शासनाला देता यावीत ही म्हणावी तर प्राथमिक अपेक्षा आहे. मुळात एप्रिल महिन्यात पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. त्याला आता होतो आहे तसाच विरोध त्या वेळीही झाला. त्यानंतर शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी निर्णय लागू न करण्याचे जाहीर केले. त्यानंतर त्या संदर्भात लेखी निर्णय जाहीर झाला नाही.

मात्र, शिक्षणमंत्र्यांनीच अनेकदा जाहीरपणे निर्णय मागे घेतल्याचे सांगितल्यानंतरही प्रत्यक्षात प्रसिद्ध झालेल्या निर्णयात त्रिभाषा सूत्राचा हट्ट कायम आहे. निर्णय प्रसिद्ध झाला तोही राज्यातील शाळा सुरू झाल्यानंतर आणि आता शासन त्यावर चर्चा करून अंतिम निर्णय घेणार असल्याचे सांगते आहे. हा अंतिम निर्णय होईपर्यंत शाळांनी काय करायचे हा प्रश्न निर्णय लागू करण्यासाठी आग्रही असणाऱ्या अधिकाऱ्यांना पडला नाही. वास्तविक कोणताही शैक्षणिक निर्णय शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी घेणे आणि त्यांच्या अंमलबजावणीची पूर्वतयारी करणे हे तार्किक आणि आवश्यक. मात्र, तार्किक गोष्टी खुंटीवर टांगून निर्णय जाहीर केले की ते मागे घ्यावे लागतात याचा अनेकदा अनुभव येऊनही शिक्षण विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेची सवय अद्याप मोडलेली नाही.

पहिलीपासून त्रिभाषा सूत्र नेमके हवे कुणाला, हा या राज्यातील जनांना आता नव्याने पडलेला प्रश्न आहे. शिक्षणमंत्री हे सत्ताधारी पक्षांतील शिवसेनेचे. त्यांचा शिक्षणाशी संबंध किती, हा प्रश्नच. तरी त्यांनीच यापूर्वी निर्णय मागे घेतल्याचे जाहीर केले होते. सत्तेतील दुसरा पक्ष राष्ट्रवादी. त्यांतील अजित पवार यांनीही त्रिभाषा सूत्र पाचवीपासूनच लागू करणे योग्य अशा आशयाचे विधान नुकतेच केले. भाजपची सत्ता असलेल्या इतर राज्यांमध्येही हे सूत्र अद्याप अमलात आलेले नाही. ज्या शिक्षण धोरणाची महती सांगून हा निर्णय घेण्यात आला, त्या शिक्षण धोरणाची जाहिरात मुळात लवचीकता या मुद्द्यावर झालेली आहे. शिवाय ते जसेच्या तसे लागू करणे बंधनकारक नाही, राज्ये त्यांच्या पातळीवर निर्णय घेऊ शकतात असे सर्वोच्च न्यायालयाने इतर राज्यांच्या प्रकरणांमध्ये नमूद केले आहे.

दक्षिणेतील राज्यांनी त्याला विरोध केलाच आहे. सध्या फक्त चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशात त्रिभाषा सूत्राचा आग्रह चालवला आहे आणि त्यालाही तेथून विरोधच होतो आहे. राज्याचा अभ्यासक्रम आराखडा जाहीर झाला त्यातही पहिलीपासून तिसरी भाषा शिकवण्याचे बंधन नाही. देशातील इतर शिक्षण मंडळांमध्ये पहिलीपासून त्रिभाषा सूत्र नाही. असे असताना अचानक कुणाच्या मना आले म्हणून हा निर्णय जाहीर करण्यात आला? या अशा कोणत्याही साध्या, तार्किक प्रश्नांचे उत्तर सरकारने दिलेले नाही. ते देता येत नसताना देशाचे गृहमंत्री ''भविष्यात या देशात इंग्रजी बोलणाऱ्यांस लाज वाटेल, अशी परिस्थिती तयार होईल,'' अशा अथार्चे विधान करतात तेव्हा त्यामागील भाषाप्रेमापेक्षा राजकारणच उघड होते. अशा परिस्थितीत राज्यातील अनेकांचा एकंदर नूर लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय मागे घेणे शहाणपणाचे. तसेही या निर्णयाशिवाय महाराष्ट्रास गो-पट्ट्यात ढकलण्याचे प्रयत्न जोमाने सुरू आहेतच. या निर्णयाने त्या प्रक्रियेस गती देऊ नये. हिंदी न आल्याने हिंदी भाषकांचेही अडत नाही. असे असताना मराठी भाषकांवर तिची सक्ती करण्यात कोणते शहाणपण? तसे करणे हे भीक मागण्याची भलामण करण्यासारखे आहे. आधीच मागे पडलेल्या महाराष्ट्रास ते अधिक मागे लोटणारे ठरेल.

# बेकायदा बांधकामे अधिकारीही जबाबदार



शहरी भागापाठोपाठ ग्रामीण भागांतही अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम, नियमबाह्य बांधकाम या समस्येचा भस्मासूर फोफावू लागला आहे. मुंबई शहर व उपनगरातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे यावर कितीही तोडगा काढला, उपाययोजना केल्या, तरी त्यावर मयार्दा पडणे स्वाभाविकच आहे. प्रशासकीय यंत्रणांच्या उपाययोजनांना यश कधीही मिळणार नाही. कारण मुंबईची भौगोलिक परिस्थिती, दररोज रोजगारासाठी-उपजीविकेसाठी आजही हजारोंच्या संख्येने येणारा लोंढा पाहता मुंबई शहर व मुंबईचे उपनगर अमिबासारखे जागा मिळेल त्या-त्या ठिकाणी अक्राळविक्राळ स्वरूपात फोफावत गेले आहे. अर्थात पालिका प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाने वेळीच तत्परता दाखविली असती, तर कदाचित मुंबई शहर व उपनगरात वेगळेच चित्र आज पाहावयास मिळाले असते. ज्या-ज्या शहरांमध्ये अतिक्रमणाची समस्या वाढीस लागते, त्या-त्या शहरांतील प्रशासनातील अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनाही दोषी धरून कारवाई केली असती, तर अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे त्यांचे काम केलेले दिसले असते. मुंबई शहरालगतच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर, पालघर, भिवंडी, नवी मुंबई, पनवेल, उरण परिसरालाही अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे या समस्येचा भस्मासूर निर्माण झाला असून बकालपणाचाही उद्रेक झाला आहे. मुळातच ज्या-ज्या वेळी प्रशासनाकडून समस्यांकडे कानाडोळा केला जातो, अतिक्रमणाला खतपाणी घातले जाते, त्या-त्या वेळी शहराला बकालपणाचा विळखा बसण्यास फारसा वेळ लागत नाही. अतिक्रमणाला, बकालपणाला त्या-त्या भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन जबाबदार असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयानेही नोंदविले आहे. ठाण्यातील अतिक्रमणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्याने अतिक्रमणाच्या समस्येचे गांभीर्य उघडकीस आले. ठाण्यातील १७ बेकायदा बांधकामांवरील कारवाईत दिरंगाई केल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक आयुक्तांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली, तर बेकायदा बांधकामांच्या पाडकाम कारवाईसाठी येणाऱ्या खर्चांपैकी १० टक्के रक्कम या बांधकामांसाठी जबाबदार असलेल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याचा विचार करा, अशी सूचना उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालिकेला केली. याशिवाय, बेकायदा बांधकामांवर कारवाई न करण्यासाठी जबाबदार असल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक आयुक्त फारूख शेख यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आल्यावर त्यांना निलंबित करण्यात आल्याचेही महापालिकेच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. याव्यतिरिक्त आणखी तीन सहाय्यक आयुक्त, तीन बीट मुकादम आणि एका बीट निरीक्षकालाही 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आल्याचे न्यायालयाला सांगितले गेले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने ठाणे महापालिकेतर्फे राबवण्यात येणाऱ्या मोहिमेचे कौतुक केले. तसेच, बेकायदा बांधकामांबाबतचा ठाणे पॅटर्न राज्यभरात राबवण्याचे मत पुन्हा एकदा व्यक्त केले. बेकायदा बांधकामे तुमच्या डोळ्यांसमोर उभी राहतात आणि महापालिकेकडून त्यांना नोटिसा बजावण्याशिवाय कोणतीही कारवाई केली जात नाही. ही स्थिती अशीच राहिली, तर ठाण्यात अराजकतेची स्थिती निर्माण होईल, अशा शब्दांत बेकायदा बांधकामांवरील कारवाईतील निष्क्रियतेवरून न्यायालयाने मागील सलग दोन सुनावणीच्या वेळी फटकारले होते. त्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने बेकायदा बांधकामांवरील आणि या कारवाईत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाईची माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयाला दिली. मुळात सरकारी जागेवर ज्या वेळी मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या निर्माण होत असतात, व्यापक स्वरूपात चाळी उभारल्या जातात. त्या चाळी, झोपडपट्ट्या एका दिवसामध्ये निर्माण होत नाहीत, त्यासाठी काही दिवसांचा कालावधी जात असतो. चाळी, झोपडपट्ट्यांची कामे सुरू असताना महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने वेळोवेळी कारवाईचा हातोडा उगारला असता, तर सरकारी जमिनीवर, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणालाही मयार्दा पडल्या असत्या. शहरांच्या बकालपणाला केवळ राजकीय घटक जबाबदार नसतात, तर पूर्णपणे प्रशासकीय घटकच कारणीभूत असतात. अतिक्रमण विभागाच्या उदासीनतेमुळे अनधिकृत बांधकामे फोफावली आहेत, अतिक्रमणे विस्तारली आहेत, हे कोणालाही नाकारता येणार नाही. आज शहरी, निमशहरी भागातील रस्त्यांवर, पदपथांवर फेरीवाल्यांनी व्यवसायानिमित्त अतिक्रमण केले आहे. फेरीवाल्यांकडून प्रत्येक महिन्याला आर्थिक मलिदा मिळत असल्यामुळे अतिक्रमण विभाग फेरीवाल्यांवर कारवाई करत नाही. फेरीवाल्यांचे बस्तान बसल्यावर हेच फेरीवाले कारवाई करण्यासाठी आलेल्या पालिका अधिकाऱ्यांवर हल्ले करत असल्याच्या घटना घडतात. कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ, असे म्हटले जाते, त्याचीच प्रचिती कारवाईसाठी आलेल्या अधिकाऱ्यांवरचे हल्ले अशा घटनांमधून येत असते. शहरांमध्ये अनधिकृत बॅनर, होर्डिंगच्या समस्येचा भस्मासूरही गेल्या काही वर्षांमध्ये फोफावला आहे. अनधिकृत बॅनर व होर्डिंगमुळे परिसराला बकालपणा येत असतो. अनधिकृत बॅनर व होर्डिंग हे राजकीय घटकांचे असल्यामुळे महापालिकेचा अतिक्रमण विभाग कारवाईचे धाडस दाखवत नाही. अनधिकृत बॅनर व होर्डिंग लावणाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे पालिका प्रशासनाला अधिकार असतानाही अशा स्वरूपात गुन्हे दाखल करण्याचे धाडस अतिक्रमण विभागाकडून दाखविले जात नाही. पदपथ व रस्त्याच्या काही भागांचे अस्तित्व संशोधनाचे विषय बनले आहेत. अनधिकृत बॅनरमुळे महसूल बुडतोय, बकालपणा वाढतोय, पण अतिक्रमण विभागाला त्याचे काहीही देणे-घेणे नसते. शहरातील समस्यांबाबत, बकालपणाबाबत प्रशासनाला धडा शिकविणे गरजेचे होते. मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका रास्त असून या निकालाचे जनसामान्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. गुन्हा करणाऱ्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. आज कोणत्याही शहराच्या वाताहतीस, नागरी समस्यांच्या उद्रेकास, नागरी सुविधांच्या दुष्काळास पालिका प्रशासनच जबाबदार असल्याने कोठे तरी त्या गोष्टींचे खापर त्यांच्यावरही फोडणे आवश्यक होते.

# सौदी अरेबियाची 'एआय' क्रांती

जगापासून काहीसा अलिप्त राहिलेला सौदी अरेबिया आता एका नव्या दिशेने वाटचाल करीत आहे. क्राऊन प्रिन्स महंमद बिन सलमान (एमबीएस) यांच्या नेतृत्वाखाली सौदी अरेबियाने आपली प्रतिमा बदलण्याचा चंग बांधला आहे. 'व्हिजन २०३०' या महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे तेलावरील अवलंबित्व कमी करून अर्थव्यवस्था विविध क्षेत्रांमध्ये विस्तारण्याचा त्यांचा मानस आहे आणि कृत्रिम प्रज्ञा (एआय) हे त्यातील एक महत्त्वाचे पाऊल आहे.




जागतिक एआय निर्देशांकात सन २०२४मध्ये सौदी अरेबियाने सरकारी एआय धोरणांमध्ये जागतिक स्तरावर आघाडी घेतली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या सौदी-अमेरिका गुंतवणूक परिषदेत क्राऊन प्रिन्स महंमद बिन सलमान यांनी 'ह्युमेन एआय' या नव्या कंपनीची घोषणा केली. सौदीच्या पब्लिक इन्व्हेस्टमेंट फंड (पीआयएफ) अंतर्गत स्थापन झालेली ही कंपनी सौदीला एआय क्षेत्रातील जागतिक नेता बनवण्यासाठी सज्ज झाली आहे. सौदीचे युवराजच पीआयएफचे अध्यक्ष असल्यामुळे या कंपनीला थेट राजेशाही पाठिंबा आहे.

'ह्युमेन एआय' प्रामुख्याने अरबी भाषेतील लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम्स) विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करेल. ही जगातील सर्वात शक्तिशाली बहुभाषिक अरबी लार्ज लँग्वेज मॉडेल्सपैकी एक असेल. यासोबतच ऊर्जा, आरोग्य, उत्पादन आणि वित्तीय सेवांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी एआय सोल्यूशन्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. या महाप्रकल्पाला बळ देण्यासाठी, सौदीने अमेरिकन क्लाउड तंत्रज्ञान कंपनी ॲमेझॉन वेब सर्व्हिसेसशी पाच अब्ज डॉलरपेक्षा अधिक रकमेचा गुंतवणूक करार केला आहे. त्यातून सौदी अरेबियामध्ये एक अत्याधुनिक 'एआय झोन' उभारला जाईल, ज्यात एडब्ल्यूएसचे प्रगत क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, सेमीकंडक्टर्स आणि एआय सेवा समाविष्ट असतील. याशिवाय, एन्व्हिडिया, एएमडी आणि क्वालकॉम यांसारख्या आघाडीच्या अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांनी सौदीला प्रगत एआय चिप्स पुरवण्यासाठी करार केले आहेत. यामुळे सौदीची डेटा सेंटर्स आणि एआय प्रशिक्षणाची क्षमता प्रचंड वाढेल. सध्या अमेरिका आणि चीनचे वर्चस्व असलेल्या एआय क्षेत्रात सौदी अरेबियाची ही महत्त्वाकांक्षा खूप मोठी वाटू शकते. परंतु सौदीकडे असे दोन महत्त्वाचे घटक आहेत, जे त्यांना या स्पर्धेत पुढे नेऊ शकतात.

सौदी अरेबियामध्ये लोकशाही नसल्यामुळे क्राऊन प्रिन्स महंमद बिन सलमान यांच्या प्रत्येक निर्णयाची तातडीने अंमलबजावणी होते. एआयसाठी आवश्यक असलेले परिसंस्थेचे बांधकाम अत्यंत वेगाने पूर्ण करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यांना इतर लोकशाही देशांप्रमाणे व्यापक सहमती, निविदा प्रक्रिया किंवा कल्याणकारी योजनांवरून अर्थसंकल्पीय तडजोडीची आवश्यकता नसते. त्याशिवाय, तेलाच्या व्यापारातून सौदीकडे जमा झालेले अमर्याद भांडवल एआयमधील मोठ्या गुंतवणुकीसाठी त्यांच्याकडे उपलब्ध आहे. सौदीच्या पब्लिक इन्व्हेस्टमेंट फंडाकडे सध्या ९२५ अब्ज डॉलरची प्रचंड मालमत्ता आहे. अमेरिकेत सौदी अरेबिया ६०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे, ज्यात ऊर्जा, कृत्रिम प्रज्ञा, पायाभूत सुविधा आणि विमानचालन क्षेत्र यांचा समावेश आहे. सौदी कंपनी डेटा व्हॉल्ट अमेरिकेतील एआय केंद्रात २० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. तर, गुगल आणि ओरॅकल यांसारख्या अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांनी सौदी अरेबियामध्ये ८० अब्ज डॉलरच्या उपक्रमांची घोषणा केली आहे.

अफाट भांडवल आणि राजकीय इच्छाशक्ती असली तरी, एआय क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची सौदीकडे सध्या तरी कमतरता आहे. सौदीच्या काहीशा कठोर धार्मिक आणि हुकूमशाही प्रतिमेमुळे एआयमधील निष्णात मंडळी तेथे स्थायिक होण्यास तयार नाहीत. यावर मात करण्यासाठी, सौदी सरकार आणि ॲमेझॉनने सौदीच्या एक लाख नागरिकांना क्लाउड कम्प्युटिंग आणि जनरेटिव्ह एआय यात प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यात 'ॲमेझॉन अकादमी' आणि महिलांसाठी विशेष कौशल्य प्रदान योजनेचा समावेश आहे. १० हजार महिलांना क्लाउड कौशल्ये शिकवणे हा त्याचा उद्देश आहे. याव्यतिरिक्त, सौदी स्टार्टअप्स ना 'एडब्ल्यूएस ॲक्टिव्हेट'सारख्या कार्यक्रमांद्वारे बळ दिले जात आहे, ज्यामुळे नवीन उद्योजकांना एआय क्षेत्रात प्रवेश मिळेल. सन २०२४मध्ये सौदी स्टार्टअप्सनी ७५० दशलक्ष डॉलरची गुंतवणूक मिळवली. स्थानिक मनुष्यबळ विकसित करण्यासोबतच, कमी कर आणि दीर्घकालीन व्हिसा देऊन परदेशी एआय तज्ज्ञांना आणि कंपन्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सौदी अरेबिया करत आहे.

सौदी अरेबियाची एआय क्षेत्रातील प्रगती ही अमेरिका आणि चीन यांच्यासाठी आव्हान आणि संधी दोन्ही आहे. अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांसोबतच्या अमेरिकी भागीदारीमुळे अमेरिकेला आर्थिक फायदा होत आहे, कारण यामुळे अमेरिकेच्या तंत्रज्ञान कंपन्यांना मोठ्या प्रमाणात भांडवल आणि नवीन बाजारपेठ मिळत आहे. परंतु, यामुळे प्रगत एआय तंत्रज्ञान मध्य पूर्वेत पसरेल व त्याचा अप्रत्यक्ष फायदा चीनला होऊ शकतो, अशी भीती काही अमेरिकी धोरणकर्त्यांना वाटते. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत हे करार झाल्यामुळे अमेरिकेत सध्या यावर फारसा निषेधाचा सूर ऐकू येत नाही. सौदीच्या एआय क्षेत्रातील प्रगतीमुळे जागतिक स्पर्धा तीव्र होईल. यामुळे पारंपरिक एआय महासत्तांना त्यांच्या धोरणांचा पुनर्विचार करावा लागेल. तंत्रज्ञान हस्तांतरण आणि जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेच्या बाबतीत तर खचितच पुनर्विचार करावा लागेल.

सौदी अरेबियाच्या या वेगवान प्रगतीसोबतच काही नैतिक आणि धोरणात्मक प्रश्नही उपस्थित होतात. सरकारकडून एआयचा वापर देखरेखीसाठी केला जाऊ शकतो, ज्यामुळे डेटा गोपनीयता आणि मानवाधिकार उल्लंघनाची भीती निर्माण होते. त्यामुळे, नवकल्पना आणि गोपनीयता, तसेच मानवाधिकारांमध्ये संतुलन राखण्यासाठी जागरूक नियमन आवश्यक आहे. पाश्चात्त्य तंत्रज्ञान आणि कौशल्य यांवर अवलंबून राहिल्यामुळे रणनीतीबाबत चिंता निर्माण होतात. विशेषतः अमेरिकेकडून; कारण यामुळे तंत्रज्ञानाच्या सुरक्षिततेबद्दल आणि चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांसाठी तंत्रज्ञान हस्तांतरणाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होते. तरीही, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देत आहेत आणि कमी कर, निवासी बोनस यांसारख्या उपायांनी गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण करत आहेत. या प्रयत्नांचा उद्देश मध्य पूर्वेमध्ये एआय संशोधक, विकसक आणि कंपन्यांना आकर्षित करणे हा आहे; जेणेकरून त्यांना वृद्धी आणि भागीदारीच्या संधी मिळतील.

'ह्युमेन एआय' हा सौदी अरेबियासाठी तेलावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेला आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात नेण्याचा एक महत्त्वाकांक्षी टप्पा आहे. जलद निर्णयप्रक्रिया आणि अफाट भांडवलामुळे एआयच्या क्षेत्रात सौदी अरेबिया वेगाने प्रगती करत आहे. प्रशिक्षण आणि स्टार्टअप परिसंस्थेच्या निर्मितीद्वारे प्रतिभा कमतरतेच्या आव्हानास तोंड दिले जात आहे. सौदी अरेबिया आणि भारतानेही कृत्रिम प्रज्ञा, सायबर सुरक्षा आणि सेमीकंडक्टर यांसारख्या नव्या तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे मान्य केले आहे. ही दोन्ही देशांसाठी एक सकारात्मक बाब आहे. याचा परिणाम जागतिक एआय स्पर्धेवर निश्चितच होईल. अमेरिका आणि चीन यांना त्यामुळे नवी रणनीती आखावी लागेल. सौदी अरेबिया एआय क्षेत्रात एक नवीन शक्ती म्हणून उदयास येत आहे, आणि त्याची ही वाटचाल जागतिक तंत्रज्ञानाच्या भविष्याला आकार देईल, यात शंका नाही.

पोलीस
बातमी पत्र



## शहापूर तालुक्यात रस्ता नसल्याने गर्भवती महिलेचे हाल



**शहापूर** : ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून समजला जातो. मात्र स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर देखील आदिवासींच्या मूलभूत गरजा पूर्ण झालेल्या नाहीत. अत्यावश्यक नागरी सुविधांपासून आजही आदिवासी वंचित आहेत. २३ जून रोजी शहापूर तालुक्यातील किन्हवली परिसरातील धक्कादायक घटना समोर आली असून येथील नडगाव ग्रामपंचायत हद्दीतील चाफेवाडी येथे आदिवासी बांधवांना ये-जा करण्यासाठी रस्ता नसल्याने येथील संगीता रवींद्र मुकणे (२१) या गर्भवती महिलेला प्रसूती करिता रुग्णालयात नेण्याकरिता चक्क झोळीतून ॲम्ब्युलन्सपर्यंत न्यावे लागले.

आरोग्य यंत्रणेची रुग्णवाहिका या ठिकाणी रस्ता नसल्याने येऊ शकत नाही. त्यामुळे येथील आदिवासी बांधवांनी या महिलेला कापडाच्या झोळीत घालून रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचवले. या ग्रामपंचायत हद्दीतील चाफ्याची वाडी ते डोंगरीवाडी असा २ किलोमीटरचा सध्याचा रस्ता १ किलोमीटर जागा खासगी असल्याने रस्त्यासाठी जागा मिळत नाही. २३ जून रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास संगीता हिस प्रसुती वेदना जाणवू लागल्याने रस्ता नसल्याने आदिवासी बांधवांनी या गर्भवती महिलेस झोळीतून रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचवले. आरोग्य यंत्रणेपर्यंत पोहोचण्यास उशीर झाल्याने या गर्भवती महिलेला आकडी आली. यामुळे तिला प्रसूती करिता ठाणे येथील सिव्हिल रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. शासनाच्या उदासीन धोरणामुळे संगीतासारख्या अनेक गर्भवती महिलांना या अगोदर देखील अशा असह्य वेदना सहन कराव्या लागल्या आहेत.

## ठाणे शहरात १०४ खेळांची मैदाने, मात्र खेळायला जागाच नाही

**ठाणे** : ठाण्यात क्रीडा संस्कृती रुजावी, क्रीडापटू तयार व्हावेत या उद्देशाने शहरात १०४ खेळांची मैदाने होती. मात्र काळाच्या ओघात अतिक्रमण आणि व्यापारीकरणामुळे खेळण्यासाठी मैदानेच उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले आहे. ठाणे महापालिकेच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप करीत ठाणे सिटिझन्स फाऊंडेशनने मैदाने वाचवण्यासाठी दंड थोपटले असुन न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला आहे. पुर्वी तलावांचे शहर असलेल्या ठाण्यात मुबलक मैदाने होती, मात्र, आता सेंट्रल मैदान, साकेत मैदान,पोलीस परेड ग्राऊंड, गावदेवी मैदान अशी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच मैदाने शिल्लक आहेत. पूर्वी ठाण्याच्या मैदानामध्ये सर्कशी तसेच मोठमोठे सांस्कृतिक कार्यक्रम होत असत. आता मैदानामध्ये अन्य बिनकामाच्या विकासकामांची भाऊगर्दी दिसत आहे. शहरीकरणामुळे वाहनांची संख्या वाढल्याने पार्किंगच्या नावाखाली काही मैदानांचे लचके तोडले आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात १०४ मैदाने आरक्षित आहेत. परंतु ही मैदाने विकासकांच्या घशात गेली आहेत. अनेक मैदानांवर झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण झालेले आहे. देखभालीचा खर्च परवडत नसल्याचे कारण पुढे करून ठाणे महापालिकेने काही मैदाने खाजगी व्यावसायिक, संस्थांना दिली आहेत. त्यांच्याकडून लग्न, पाट्यां, मोठ्या समारंभासाठी मैदाने भाड्याने दिली जातात, खेळाचा उद्देश बाजूला पडुन मोठा नफा कमावला जात आहे. तेव्हा, ठाण्यातील नागरिकांच्या हक्काची मैदाने वाचवण्यासाठी ठाणे सिटिझन्स फाउंडेशनने दंड थोपटले आहेत. २०१४ पासून त्यांचा विविध स्तरावर लढा सुरू आहे. ठाणे महापालिका ते थेट क्रीडामंत्री, मुख्यमंत्र्यांपर्यंत साकडे घातले.

## केडीएमसी क्षेत्रात क्लस्टर योजना राबवण्याची मागणी

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात क्लस्टर योजना राबविण्याच्या मागणीसाठी सी.पी.आय. एम.एल. पक्ष आक्रमक झाला आहे. डोंबिवलीतील दत्तनगर प्रभागातील नागरिकांनी केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढत धडक दिली. १५ ऑगस्टपर्यंत मागणी मान्य न झाल्यास मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर काळेझेंडे नेणार असल्याचा इशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. केडीएमसी क्षेत्रांमध्ये दत्तनगर मौजे आयरे येथे महाराष्ट्र शासन या जागेवरील जीर्ण, अनधिकृत इमारती चाळी यांच्या करता प्राध्यानाने क्लस्टर गृहनिर्माण योजना राबविण्या करिता बायोमेट्रिक सर्वेक्षण होऊन पडताळणीही पूर्ण होत आहे. शासनाच्या जागेवर क्लस्टर पुनर्वसन योजना राबवण्यासाठी आवश्यक असलेले बहुतांश क्षेत्र सर्वे ल ९३ अ/६३, मौजे आयरे, डोंबिवली (पूर्व) दत्तनगर येथील पडताळणीठी बहुतांश झालेली आहे. तसेच शासनाच्या जागेच्या बाजूचा




परीसराचे ही सर्वेक्षण झालेला आहे. त्यांची सर्वेक्षण यादी प्रकाशित करावी. रहिवाशांची सर्वेक्षण यादी प्रदर्शित करून, ती शासनाकडे मंजुरीसाठी पाठवून तातडीने विकासक नेमण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच अन्य जागेवरील पडताळणीचे काम शिबिर लावून पूर्ण करावे जेणे करून ते लवकर होईल. व क्लस्टर सर्वेक्षणा करिता नेमलेल्या ठेकेदारांवर कारवाई करून त्यांना काढून टाकावे आदी मागण्या असून या मागण्या १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण न झाल्यास मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर काळे झेंडे नेण्याचा इशारा सीपीआय डोंबिवली सदस्य सुनील नायक यांनी

## 'जलमापके' बंद असल्यास पाण्याचे बिल दुप्पट... बीएमसीच्या जल विभागाची माहिती

**मुंबई** : मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाण्याचे मोजमाप ठेवणारी 'खासगी जलमापके' बंद असल्यास पालिकेकडून पूर्वीच्या बिलाच्या सरासरी रकमेवर १०० टक्के अधिक शुल्क आकारले जाणार आहे, तर झोपडपट्टी भागांमध्ये 'जलमापके' बंद राहिल्यास पूर्वीच्या सरासरी बिलाच्या रकमेवर २५ टक्के अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. याबाबत महापालिकेने नियमावलीतील पोटनियमांमध्ये बदल करून या सुधारित नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे 'जलमापके' बंद असल्यास दुप्पट बिले पाठवली जातील, अशी माहिती जल विभागाकडून देण्यात आली.

मुंबई महापालिकेच्या वतीने मुंबईतील जनतेला सुमारे ४,१००



दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. पिण्यासाठी तसेच अन्य वापरासाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या घरगुती आणि अनिवासी वापराच्या पाण्याची देयके जल आकार नियमावली आणि मलनिःसारण व टाकाऊ पदार्थ निष्कासन नियमावलींतर्गत जारी केली जातात. या नियमावलीताल सुधारित पोटनियमांमध्ये सुस्पष्टता आणण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे. याबाबतच्या सुधारित पोटनियमांना महापालिकेने मंजुरी दिली आहे.

तसेच झोपडपट्टीतील 'निवासी खासगी जलमापक' जर १२ महिन्यांहून अधिक काळ नादुरुस्त असेल तर त्यांना अंदाजित बिले पाठवली जातात, त्याऐवजी आता सरासरी अंदाजित रक्कम जेवढी येईल त्यावर १०० टक्के अधिक वाढ केली जाणार आहे, तर १२ महिन्यांपासून अधिक काळ 'रिडिंग' उपलब्ध नसेल किंवा जमिनीखाली गाडलेल्या अवस्थेत असेल तर अंदाजित बिलावर २५ टक्के अधिक वाढ केली जाणार आहे.

### 'आरटीई' अंतर्गत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंडांतर
## नववीपासून शुल्क आकारणीमुळे भवितव्य धोक्यात

**नवी मुंबई** : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ (आरटीई ॲक्ट) अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या अनेक गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर अंधाराचे सावट येत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून आरटीई अंतर्गत नामांकित खासगी शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नववीत प्रवेश घेण्यासाठी लाखोंची फी भरण्यासाठी शाळेकडून दबाव टाकण्यात येत असल्याचे प्रकार घडू लागले आहेत. गरजू विद्यार्थ्यांना अखंडित शिक्षण मिळावे, यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी पालकांकडून मागणी करण्यात येत आहे.

आरटीई अंतर्गत इयत्ता आठवीपर्यंत मोफत शिक्षण मिळाल्यानंतर शाळांकडून नववीसाठी सदर विद्यार्थ्यांकडे भरमसाट शुल्क मागण्यास सुरुवात केली आहे. आरटीई अंतर्गत इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबईतील नामांकित मोठ्या शाळा इयत्ता नववीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी न भरल्यास शाळेतून काढून टाकत आहेत. विशेष म्हणजे अनेक शाळांनी शुल्क न भरल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्याची आणि शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र न देण्याची धमकी देण्यास सुरुवात केली आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होत असल्याने त्यांचे शैक्षणिक भवितव्य संकटात सापडले आहे.

नवी मुंबईतील खासगी शाळांना सिडकोकडून अत्यल्प दरात भूखंड मिळाल्याने त्या अप्रत्यक्षपणे शासनाच्या लाभधारक आहेत. त्यामुळे अशा शाळांनी आरटीई लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळाबाहेर काढणे अयोग्य आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी त्वरित हस्तक्षेप करून सिडकोमार्फत नवी मुंबईतील शाळांना समज द्यावी, तसेच आरटीई विद्यार्थ्यांचा नववीत प्रवेश रद्द होणार नाही, यासाठी आवश्यक आदेश निर्गमित करावेत. त्याचप्रमाणे गरजू विद्यार्थ्यांना अखंडित शिक्षण मिळावे, यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.




"नवी मुंबईतील खासगी शाळांनी सिडकोकडून अत्यल्प दरात भूखंड मिळवले आहेत. नवी मुंबईतील अशा शाळांना संबंधित यंत्रणांनी समज द्यावी, तसेच आरटीई विद्यार्थ्यांचा नववीत प्रवेश रद्द होणार नाही, यासाठी आवश्यक आदेश निर्गमित करावेत."

**-सुनील चौधरी अध्यक्ष, नवी मुंबई पालक संघटना**

## पाऊस पडल्यानंतर आदिवासी भागात पहिलाच साजरा केला जातो 'हा' सण

**जव्हार** : आदिवासी बहुल जव्हार तालुक्यात मान्सून सत्रात सर्वात पहिला येणारा कोवळी भाजीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवीन पाण्याची नवीन मोड आणि पावसाळ्याची सुरुवात याचा आनंद व्यक्त करण्यासाठी शेतकरी आपल्या पिकांची पेरणी पूर्ण झाल्यावर आणि पाऊस पडल्यानंतर जंगलात, कडेकपारात- माळरानावर निसर्गतः उगवते ती भाजी जमा करतात. गावदेवता,निसर्ग देवता यांना गावातील पुजारी शेंदूर लावतात आणि देवाला विनवणी करून मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जातो. यंदा मे महिन्यात पाऊस झाल्याने रानभाज्या लवकर उगवल्यात. डोंगराळ भाग ज्या भागात पाऊस अधिक अशा सर्वत्र जंगलात माळरान परिसरात मोह ,टोळंबा ,शेवळी, बोंडारा, कुहरुळा, मोखा, पेंड्रा या उन्हाळी हंगामातील तर रान तेरा, आर्कया,उळसा,करटुल आंबटवेल , कोळु, कांचन, रान ज्योत, भरडा या भाज्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर येतात.



सुरगाणा, कळवण, पेठ, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, डांग परिसर, जव्हार, मोखाडा, ठाणे, पालघर परिसर हा रानभाज्यांनी अधिक फुलून गेला आहे. हा सण कॅलेंडरप्रमाणे एखाद्या विशिष्ट तिथीलाच येतो असे नाही.तर पाऊस पडल्यानंतर कोवळी भाजी रानात उगवली का हे पाहून गावातील ज्येष्ठ नागरिक एकत्र येवून एक वार निश्चित करतात. जंगलातील भाजी ही दिवसा जावून घरी आणल्यानंतर गावाच्या गावदेवीजवळ थोडीशी भाजी ठेवून नंतर संध्याकाळी प्रत्येक घरोघरी शिजवली जाते. त्यानंतर कुलदैवतासाठी निवद (नैवद्य) ठेवून नंतर घरातील लेकी बाळीसह सगळेजण जेवायला बसतात.या सणाला नवीन लग्न होवून सासरी गेलेल्या पोरी आवर्जून माहेरी आणल्या जातात. कोवळी भाजी ही बलवर्धक,रोगप्रतिकार शक्तीत वाढ करणारी,मेंदू सतेज ठेवणारी व स्त्रीयांच्या गर्भाशयातील विकार दूर करणारी आहे,असे जुनी- जाणती माणसे म्हणतात.या सणाच्या दिवशी आदिवासी पाड्यावर संध्याकाळी माणसे तारपा नाच, कांबड नाच,ढोलनाच पोरं पोरी पुरुष स्त्रिया अगदी म्हातारी माणसे देखील तालासुरात नाचतात आणि आपल्यापरीने हा शेतकरी राजा निसगार्ला सामूहिकरित्या धन्यवाद देतो.

## कल्याण रोडवर तुफान राडा!
### ऑन-ड्युटी ट्रॅफिक पोलिस आणि दुचाकीस्वारामध्ये जुंपली

**कल्याण** : कल्याण-शहाड रोडवरील मोठ्या वाहतूक कोंडीदरम्यान कल्याणमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. कर्तव्यावर असलेले वाहतूक पोलिस सचिन ओंबासे आणि मयूर केणे नावाच्या दुचाकीस्वारामध्ये जोरदार हाणामारी झाली. वाहतूक कोंडी दरम्यान दुचाकीस्वार चुकीच्या बाजूने गाडी चालवत असल्याचा आरोप आहे. या दरम्यान पोलिसांनी त्याला पकडले असता, प्रत्युत्तरात दुचाकीस्वाराने रागाच्या भरात पोलिसांवर हल्ला केला. सदर घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

इंटरनेटवर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मयूर केणे सचिन ओंबासेंच्या शर्टचा कॉलर धरून रस्त्याच्या मधोमध त्यांना शिवीगाळ करताना दिसत आहे. पोलिसांनीही त्याला मारहाण करून प्रतिसाद दिला आणि दोघांमध्ये हाणामारी सुरू झाली. सुमारे अर्धा तास चाललेल्या या हाणामारीत, रस्त्याने



जाणाऱ्या लोकांनी मध्ये पडून हाणामारी थांबवली. मिळालेल्या माहितीनुसार, कल्याणमधील महात्मा फुले पोलिस ठाण्यात मयूर केणे याच्याविरुद्ध अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, अधिकाऱ्यांनी अद्याप या वादावर कोणतेही अधिकृत विधान केलेले नाही. कल्याण-शहाड पुलावर वारंवार होणाऱ्या गर्दीबद्दल स्थानिकांनी तक्रार केली आहे आणि योग्य वाहतूक व्यवस्थापनाची मागणी केली आहे.

दुसरीकडे, बाईक वेगात चालवून जोरात हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून दोन गटांत दगडफेक झाली. सोलापूर शहरातील घोंगडे वस्तीत रात्री दहानंतर सुमारे अर्धा तास दोन गटांमध्ये तुफान दगडफेक झाली. रस्त्यावरील अनेक वाहनं आडवी करण्यात आली. यावेळी गल्लीमध्ये दगडांचा खच पडला. या दगडफेकीत माजी नगरसेवक सुरेश पाटील यांची दोन मुले बिपीन आणि संदीप हे जखमी झाले. दुसऱ्या गटातील रियाज नदाफ (वय २१, रा. घोंगडे वस्ती) याच्यासह चार युवक युवकही जखमी झाले आहेत. सोलापूर शहरातील घोंगडे वस्ती परिसरात हि घटना रविवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेत घोंगडे वस्ती परिसरातील रहिवासी रऊफ इनामदार आणि त्याचा मित्र हे गाडीवरून जात होते. यावेळी रऊफ इनामदार याने गाडीचा हॉर्न वाजवत समोरच्यांना रस्ता सोडण्याची मागणी केली. त्यावेळी जोरात हॉर्न का वाजवतो? यावरून भाजपचे माजी नगरसेवक सुरेश पाटील यांचा मुलगा बिपीन पाटील आणि रऊफ इनामदार यांच्यात बाचाबाची झाली.

### बनावट इनपूट टॅक्स क्रेडिटचा घोटाळा उघड
## संत ट्रेडिंग कपनीच्या मालकाला अटक

**नवी मुंबई** : प्रत्यक्षात वस्तू किंवा सेवा न मिळवता ७३.३५ कोटी रुपयांच्या खोट्या व बनावट पावत्यांचा वापर करुन इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवणाऱ्या मे संत ट्रेडिंग कंपनीवर बेलापूर सीजीएसटी अर्थात केंद्रीय वस्तू आणि सेवा कर मंडळ आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांनी छापा मारुन १३.२० कोटी रुपयांचा बनावट इनपुट टॅक्स क्रेडिटचा घोटाळा उघडकीस आणला आहे. या कारवाईनतर सीजीएसटीच्या अधिकाऱ्यांनी सदर कंपनीच्या मालकाला अटक केली आहे.

बेलापूर सीजीएसटीच्या अधिकाऱ्यांनी केंद्र सरकारकडून मिळालेल्या गुप्त माहितीनंतर मोबाइल रिचार्ज व टेलिकॉम सेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या संत ट्रेडिंग कंपनीच्या कार्यालयावर गत आठवड्यात छापा मारला होता. तसेच या कंपनीच्या सर्व व्यवहारांची तपासणी केली होती. अधिक




**बनावट पावत्यांचा वापर**

तपासात संत ट्रेडिंग कंपनीने मि. जेट लाइनर एव्हिएशन टेक्निक प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेसोबत बेकायदेशीर व्यवहार केल्याचे तसेच सदर कंपनीने कोणत्याही वस्तूंचा प्रत्यक्ष व्यापार किंवा व्यवहार केला नसल्याचे आढळुन आले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासात सदर कंपनीने ७३.३५ कोटी रुपयांच्या खोट्या व बनावट पावत्यांचा वापर करुन १३.२० कोटी रुपयांचे इनपुट टॅक्स क्रेडिट मिळविल्याचे आढळून आले.

त्यानंतर सीजीएसटीच्या अधिकाऱ्यांनी मे संत ट्रेडिंग कंपनीविरोधात १९ जून रोजी २०१७ मधील कलम १३२ (१) (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करुन कंपनीच्या मालकाला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. या चौकशीत त्याने कोणताही इनवर्ड सप्लाय घेतलेला नसताना बनावट इनव्हॉइसच्या आधारे त्याने ही फसवणूक केल्याचे कबुल केले. त्यानंतर त्याला दुसऱ्या दिवशी न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याला ३ जुलै पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. जीएसटी विभागाकडुन या प्रकरणाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

## जावयाचा सासूरवाडीतील तिघांवर हल्ला

**उल्हासनगर** : उल्हासनगर कॅम्प न ४ भागातील भरत नगर परिसरात जावयाने सासू-सासरे आणि मेहुण्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उल्हासनगरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रेखा गावडे, चिदानंद गावडे आणि रोहित गावडे हा हल्ल्यात यामध्ये जखमी झाले आहेत. तर समाधान बाविस्कर असे हल्ला करणाऱ्या जावयाचे नाव आहे. समाधानचे २० मे रोजी चिदानंद गावडे यांच्या मुलीशी लग्न झाले होते. मात्र लग्नानंतर काही दिवसातच पती-पत्नीमध्ये छोट्या छोट्या कारणांमुळे वादविवाद सुरू झाले होते. सततच्या वादामुळे चिदानंद यांची मुलगी कायमची माहेरी आली. यावेळी तिने आपल्यासोबत स्वतः खरेदी केलेल्या संसार उपयोगी वस्तू देखील आणल्या होत्या. याच वस्तू मागण्यासाठी समाधान आपल्यासोबत पाच ते सहा जणांना घेऊन गावडे यांच्या घरी गेला होता.

यावेळी गावडे यांनी विरोध केल्यानंतर समाधान व सोबत आलेल्या पाच ते सहा जणांनी लोखंडी रॉड आणि लाठ्याकाठ्यांनी रेखा गावडे, चिदानंद गावडे आणि रोहित गावडेवर जीवघेणा हल्ला केला. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## वसईत 'बर्थ डे'साठी जमले, पार्टी केली, दारू प्यायले आणि...

**विरार** : वसई पूर्वेच्या पापडी येथील औद्योगिक वसाहतीजवळ रविवारी रात्री वाढदिवसाच्या पार्टीदरम्यान झालेल्या वादातून चाकूने भोसकून एकाचा खून करण्यात आला आहे. आकाश धर्मा पवार (वय ३०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, याप्रकरणी मनोज रमेश पांडे (वय ३७) हा देखील जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पापडी येथील भंगार दुकानाच्या मागील बाजूस रविवारी सायंकाळी साडेआठच्या सुमारास चार ते पाच जणांचा गट वाढदिवस साजरा करण्यासाठी आला होता. पार्टीदरम्यान मद्यप्राशन झाले. त्यानंतर आकाश पवार, राहुल भुरकुंड (वय २७) आणि मनोज पांडे यांच्यात शाब्दिक वाद झाला.




वाद अधिकच वाढत गेल्याने आरोपी मनोज पांडे याने आकाश आणि राहुल यांच्यावर चाकूने हल्ला केला.

या हल्ल्यात आकाशच्या पोटाच्या डाव्या बाजूस गंभीर इजा झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. यात राहुल भुरकुंड जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. हल्ल्यानंतर आरोपी मनोज पांडे सुद्धा वादात जखमी झाला असून सध्या त्याच्यावर वसई येथील कार्डिनल ग्रेस रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेबाबत माहिती देताना वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगांवकर यांनी सांगितले की, आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्याच्यावर अटकेची कारवाई करण्यात येईल. अन्य साथीदारांचे जबाब नोंदवले जात असून, पुढील तपास सुरू आहे.

## चार महिन्यांपूर्वी प्रेम प्रकरण समोर, अचानक कर्नाटकच्या तरुणाची सांगलीत बॉडी... हात बांधलेले, लिंबाच्या झाडाला

**सांगली** : कर्नाटक राज्यातील अथणी तालुक्यातील खिळेगाव येथील तरुण गणेश राजू शिवपुंजे (२२) याचा मृतदेह कवठे महांकाळ तालुक्यातील रांजणी गावच्या हद्दीत आढळला. लिंबाच्या झाडाला गळफास लावलेल्या संशयास्पद अवस्थेत कवठेमहांकाळ पोलीसांना तरुणाचा मृतदेह आढळून आला. ही घटना गुरूवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

रांजणी येथील घटनास्थळी खिळेगाव येथील नागरिकांनी गर्दी केलेली होती. तरुणाचे हात पाठीमागील बाजूस हेडफोनच्या वायरने बांधलेले दिसून आले. घटनास्थळी कवठे महांकाळ आणि अथणीचे पोलीस दाखल झाले होते. घटनास्थळ पाहता गणेश शिवपुंजेच्या मृत्यूबाबत संशयास्पद अंदाज व्यक्त केला जात आहे.

मृत तरूण गणेश शिवपुंजे याच्यावर अथणी पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल असल्याची माहिती आहे. घटनास्थळी मोटरसायकल अथवा फोन अशा गोष्टी आढळून आलेल्या नाहीत. खिळेगावपासून रांजणी येथील कुरण दोन ते अडीच कि.मी.अंतरावर आहे. रांजणी येथील घटनास्थळी तातडीने पोलिसांनी पंचनामा केला. मृतदेहावर कवठे महांकाळ येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

**मृत तरुणावर प्रेम प्रकरणातून पोक्सो अंतर्गत गुन्हा**

खिळेगाव येथील तरुण गणेश शिवपुंजे याच्यावर चार महिन्यांपूर्वी प्रेम प्रकरणातून अथणी पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे. एका तरुणीसोबत त्याचं प्रेम प्रकरण सुरू होतं. काही दिवस दोघेजण पळून गेले होते. याप्रकरणी अथणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. काही दिवसांपूर्वी अल्पवयीन तरुणीला गणेश शिवपुंजेने गावात परत सोडलं होतं, अशी चर्चा आहे. अथणी पोलीस गणेश शिवपुजे या तरुणाच्या मागावर होते. मृत गणेश शिवपुंजे या तरुणाचा मृतदेह रांजणी गावच्या हद्दीत असणाऱ्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत कवठे महांकाळ पोलिसांना आढळून आला आहे. तर पायाजवळ एक छोटी रश्शी पडलेली दिसून आली. घटनास्थळाचं वर्णन पाहता सर्व संशयास्पद दिसून येत आहे. कवठे महांकाळ पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत घटनेची नोंद करण्यात आली नव्हती.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com